राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची (इ.१० वी व १२ वी) परीक्षा फी माफी योजनेसाठी निधी खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक:- शैशुमा-२०१८/प्र.क्र.१३२/ एसडी-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक :- ५ मार्च, २०१९.

वाचा :-

१) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि -५, दि. १८ ऑक्टोबर, १९९३

२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण - २०१७/प्र.क्र.१७३/ २०१७/म-७, दि. ७ ऑक्टोबर,२०१७

३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक -एससीवाय- २०१८/प्र.क्र.८९/ म-७, दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ व दि. ६ नोव्हेंबर, २०१८.

४) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.निधीवि-२०१८/प्र.क्र.५०/एसडी-५, दि.१३ डिसेंबर, २०१८.

५) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.अनुवि-४९१८/(४२/१८)/अर्थसंकल्प, दि.१८ डिसेंबर, २०१८.

६) शिक्षण संचालक यांचे पत्र क्र.शिष्यवृत्ती/१८-१९/इ. १० वी व १२वी/शु.माफी/२२१ /१३५६४, दिनांक २८ डिसेंबर, २०१८.

शासन निर्णय :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १८ ऑक्टोबर, १९९३ च्या शासन निर्णयान्वये टंचाईग्रस्त भागातील इ.१० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीची योजना कार्यान्वित आहे. महसूल व वन विभागाने संदर्भाधीन क्र. २ दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये दुष्काळ घोषित करण्याबाबत सुधारित कार्यपध्दती विहीत केली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन क्र. ३ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील जून ते सप्टेंबर या कालावधीतील १५१ तालुक्यामध्ये गंभीर/ मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना लागू करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. तसेच दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या १५१ तालुक्याव्यतिरीक्त इतर तालुक्यातील ज्या मंडळामध्ये जून ते सप्टेंबर ,२०१८ या कालावधीतील एकूण २६८ महसुली मंडळामध्ये दुष्काळ घोषित करुन विविध उपाययोजना लागू करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

२. सन २०१८-१९ मधील दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची इ.१० वी व १२ वी ची परीक्षा फी माफी या योजनेसाठी शासनाच्या दि.१० मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्य मंडळ, पुणे

या कार्यालयास रु.३१,४८,६६,५१०/- एवढा निधी दिला होता. सदर निधीपैकी राज्य मंडळाकडे शिल्लक असलेली रु. ७,८१,५९,९०५/- तरतूद तसेच सन २०१७-१८ मधील संचालनालयस्तरावरुन रु. ५१,०९,०००/- तरतूद राज्य मंडळाकडे दि. २२ मार्च , २०१८ रोजी वर्ग करण्यात आली होती. सद्यःस्थितीत राज्यमंडळाकडे एकूण रु. ८,३२, ६८,९०५/- एवढा निधी शिल्लक आहे. या शिल्लक निधीमधून राज्य मंडळाने सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मधील महसूल व वन विभागाने घोषित केलेल्या टंचाईग्रस्त भागातील इ.१० वी व १२ वी मधील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफी/प्रतिपूर्ती करण्याबाबतची कार्यवाही प्रथमतः करावी . त्यानंतर तरतुद कमी पडल्यास सन २०१८-१९ करीता रु. ३८०७.३ हजार उपलब्ध तरतूदीमधून विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफी/प्रतिपूर्ती करण्याबाबतची कार्यवाही करावी. दुष्काळग्रस्त भागातील पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफी/प्रतिपूर्ती करण्याची कार्यवाही राज्य मंडळ, पुणे यांनी एक महिन्याच्या आत करावी.

३. वित्त विभागाच्या दिनांक २५ जानेवारी, २०१९ च्या परिपत्रकानुसार या योजनेकरिता १०० टक्के मंजूर तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ७० टक्के मर्यादेत रु. ३८०७.३ हजार यापूर्वीच वितरीत करण्यात आली आहे. उर्वरित ३० टक्के रु. १६३१.७ हजार निधी वितरणास व खर्चास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

४. आयुक्त (शिक्षण) , महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर १०० टक्के निधी सचिव, राज्य मंडळ , पुणे यांच्याकडे वर्ग करण्याची कार्यवाही करावी. त्या अनुषंगाने सहाय्यक संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. मागणी क्र.ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, (०४) अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी, (०४)(०१) अवर्षणग्रस्त खेडयातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/फी ची प्रतिपूर्ती (२२०२ २५८८) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या निधीतून खर्च करण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१९०३०५१२३६०६४०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Neha Nandkumar Humraskar

Digitally signed by Neha Nandkumar Humraskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fad9131f2c2ae9d6d9bb053715c4b9e08b15382beb01922a7bf2c233de3f7a45, cn=Neha Nandkumar Humraskar
Date: 2019.03.05 12:38:00 +05'30'

(नेहा हुमरसकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

२. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३. मा.प्रधान सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १, मुंबई
५. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र १, मुंबई १
६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
७. वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे.
११. सचिव, राज्य मंडळ, पुणे.
१२. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१३. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
१५. निवड धारिका एसडी.-५